Indian Streams Research Journal
Vol.2,Issue.III/April; 12pp.1-4 प्रा. डॉ. प्रताप पाटील ISSN:-2230-7850

Research Papers

# मानवी हक्काचे आंतरराष्ट्रीयीकरण

प्रा. डॉ. प्रताप पाटील
सहयोगी प्राध्यापक
राज्यशास्त्र विभागप्रमुख
हुतात्मा बहिर्जी स्मारक महाविद्यालय,
वसमत ता. वसमत
जि. हिंगोली

## प्रस्तावना :

आजपर्यंतच्या मानवी हतिहासामध्ये मानवाच्या प्रतिष्ठेसाठी अनेक प्रयत्न झालेले दिसून येतात. विविध सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरांमधील विचारवंतांनी मानवी हक्कांची संकल्पना मांडण्याचे आणि ती विकसीत करण्याचे कार्य केले आहे. राजकीय नेत्यांनी व कायदेपंडीतांनीही या संकल्पनेचा पुरस्कार केला. त्यामुळेच व्यक्तिच्या अधिकार रक्षणाच्या लिखीत तरतूदींचा समावेश राष्ट्रीय कायद्यात होवू शकला. एकोणविसाव्या शतकामध्ये आणि पूढे पहिल्या महायुद्धानंतर मानवी अधिकारांचे मापंड प्रस्थापीत करण्यासाठीही पावले उचलली गेली. परंतू मानवी हक्काच्या संवर्धनासाठी व संरक्षणासाठी व्यापक आंतराष्ट्रीय व्यवस्था ही मात्र विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुस्थापीत झाली. प्रामुख्याने संयुक्त राष्ट्र, त्यांचा विशेष समित्या व शासकीय पातळीवर विविध राष्ट्रांना बांधणा–या प्रादेशिक संघटना यांच्यामुळे हे कार्य होवू शकले.

### ऐतिहासिक विकास :

मनवी हक्काची संकल्पना विसाव्या शतकात लोकप्रिय झाली असली तरी या कल्पेची पाळेमुळे प्राचीन ग्रीक तत्वज्ञानात सापडतात असे मानवी हक्कांच्या अभ्यासकांचे मत आहे.

सॉक्रिटिस आणि प्लेटो यांच्या काळात मानवी अधिकारासंबंधीचे विचार नैसर्गिक नियम आणि राजकीय आदर्शवादाशी जोडलेले होते. राज्य स्थापन होण्यापूर्वी मानवी समाजात काही नैसर्गिक अधिकार होते असे स्टाईक तत्वज्ञानी आणि सेंट ऑगस्टीनचे मत आहे.

मध्ययुगात (13 ते 17 वे शतक) पूनजारणाच्या चळवळीमुळे आणि सामंतशाहीच्या पतनामुळे मनुष्याच्या परंपरागत जून्या विचारात परिर्वतन झाले आणि मानवी अधिकार समाजाच्या विकासासाठी आवश्यक आहेत हा विचार पूढे आला. परिणामतः इंग्लडमध्ये मॅग्नाकार्टा पूनर्जागरणाच्या (हक्कांची सन) 1225, पिटीशन ऑफ राईट्स (हक्कविशयक निवेदन) 1628 आणि बिल ऑफ राईट्स (हक्क विषयक विधेयक) 1689 या कायद्यांची निर्मिती झाली.

18 वे शतक हे प्रबोधनाचे शतक समजले जाते. याच काळात इंग्लडमध्ये जॉन लॉक, फ्रान्समध्ये मॉन्टेस्क्यु, वाल्हेयर आणि सुसोने मानवाच्या नैसर्गिक अधिकारांची आवश्यकता प्रतिपादन केली.

डदारमतवादाचा जनक आणि सामाजिक करार सिध्दांताचा समर्थक जॉन लॉकनेही राज्य स्थापन होण्यापूर्वीच मनूष्यास जीवन जगण्याचा स्वातंत्र्याचा आणि संपत्ती बाळगण्याचा नैसर्गिक अधिकार असे मत मांडले. तसेच राज्याने या मानवी अधिकाराचे रक्षण करावे आणि जर राज्याकडूनच या अधिकारांवर अतिक्रमन झाले तर राज्याच्या विरोधात जनतेने विद्रोह करावा असत मत मांडले आहे.

18 व्या शकताच्या शेवटी आणि 19 व्या शतकाच्या सुरुवातीला पाश्चिमात्य जगात जॉन लॉक व रुसोच्या विचारांचा मोठा प्रभाव पडता. परिणामतरु 1776 ला पेनसिल्वानिया घोषणापत्र, 1789 च्या फ्रांस राज्य क्रांतीतील नागरिकांच्या हक्कांचे घोषणापत्र, 1791 अमेरिकेतील मानवी हक्कांची सन प्रकाशित झाली आणि याच काळात मानवी हक्कांचा तत्वा म्हणून स्विकार अनेक राज्यांनी केला.

पहिल्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर स्थापन झालेल्या राष्ट्र संघामुळे 1919 तर मानवी हक्कांची आवश्यकता आंतराष्ट्रीय स्तरावर चर्चिली जावू लागली. अल्पसंख्यांक समूह, युध्दग्रस्त लोक, कामगार वर्ग, बालमजूर यांच्या हिताकडे राष्ट्रसंघाने विशेष लक्ष दिले. मानवी हक्काच्या विकासात दुस–या महायुध्दानंतर स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेनने ख–या अर्थाने महत्वाची भुमिका बजावली.

### संयुक्त राष्ट्र संघटना आणि मानवी हक्काचा जाहीरनामा :

28 जून 1945 रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेने पारित केलेल्या घोषणापत्रात मानवी हक्काबाबतचा बळकरट दृढ विश्वास प्रतिबिंबितीत होतो. घोषणापत्रात जागतिक संघटनेची मुलभूत उद्दीष्टे पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आली. आगामी पिढयांचे युध्दाच्या आपत्तीपासून संरक्षण करणे आणि मानवी योगयता व सन्मान, स्त्री आणि पुरुष यांच्या करिता समान हक्क व मूलभूत मानवी हक्क यांच्या बद्दल पुनश्च विश्वास व्यक्त करणे. वंश, लिंग, भाषा, किंवा धर्म या आधारावर भेदभाव न करता मूलभूत मानवी हक्क आणि स्वतंत्र्य याबद्दल आदर वृध्दीगत करण्यासाठी प्रोत्साहन देणे हे संयुक्त राष्ट्रसंघाचे उद्दीष्ट घोषणापत्राच्या कलम 1 मध्ये नमूद करण्यात आले.

### मनवी हक्क विषयक कायदाः

संयुक्त राष्ट्राच्या उद्दीष्ट्यानुसारच आर्थिक आणि

Please cite this Article as : प्रा. डॉ. प्रताप पाटील , मानवी हक्काचे आंतरराष्ट्रीयीकरण : Indian Streams Research Journal (April ; 2012)

सामाजिक समिती जी की संयुक्त राष्ट्रसंघटनेची एक प्रमुख समिती आहे. तीने 1945 मध्ये मानवी हक्क आयोग स्थापन केला. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घोषणापत्रात उल्लेख केलेले आणि मानवी हक्क आणि स्वातंत्र्यविषयक आंतरराष्ट्रीय विधेयक तयार करण्याची जबाबदारी मानवी हक्क आयोगाकडे सोपविण्यात आली. 10 डिसेंबर 1948 रोजी मानवी हक्कांबाबतच्या आंतराष्ट्रीय मसूदा तयार होण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाउल टाकण्यात आले. या दिवशी संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सर्वसाधारन सभेमध्ये सर्व राष्ट्र आणि मानवी समूह यांनी साध्य करण्याचे आदर्शवत तत्व म्हणून मानवी हक्काच्या जागतिक घोषणापत्रास मान्यता देण्यात आली.

***जागतिक घोषणापत्रात उद्घोषीत करण्यात आलेले हक्क :***

या हक्कांची स्थुलमानाने दोन भागात विभागणी करण्यात येईल. पहिल्या भागात नागरी आणि राजकीय हक्कांचा समावेश होतो. व्यक्तिचे जीवन, स्वातंत्र्य आणि सुरक्षितता, गुलामगिरी आणि यातना यापासून व्यक्तीची मुक्तता, कायद्यासमोर व्यक्तिंना समान मानने, मनमानीपणे केलेली अटक, स्थानबध्दता आणि हद्दपारी यापारी यापासून संरक्षण, न्याय सुनावणीचा हक्क, मालमत्तेच्या स्वामीत्वाचा हक्क, राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याचा हक्क, विवाहविशयक हक्क आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततामय पध्दतीने सभा घेणे किंवा संघटित होणे, निवडलेल्या प्रतिनिधीमार्फत स्वतः देशाच्या शासनात सहभागी होणे या हक्कांचा घोशणापत्राच्या पहिल्या भागात समावेश होतो. दुस–या भागामध्ये आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क येतात. कामाचा हक्क, समान कामासाठी वेतन मिळण्याचा हक्क, कामगार संघटनेचे सदस्य होणे आणि कामगार संघटना स्थापन करण्याचा हक्क, समाधानकारक जीवन जगण्याचा हक्क, शिक्षण प्राप्त करण्याचा हक्क, सांस्कृतिक जीवनात सहभागी होण्याचा हक्क इत्यादी हक्कांचा समावेश दुस–या भागात करण्यात आला आहे.

***मनवी हक्काच्या संरक्षणातील आडथळे :***

समाजाचा एक सदस्य या नात्याने व्यक्तिला सुरक्षेचा हक्क आहे. राष्ट्रीय प्रयत्न व आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या आधाराने आणि प्रत्येक राष्ट्राच्या संघटन व साधानांनुसार व्यक्तींना आपले आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क मिळविण्याचा अधिकार आहे. व्यक्तिच्या सन्मानासाठी आणि व्यक्तिमत्वाच्या खुल्या विकासासाठी हे हक्क आवश्यक आहेत. या हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्रातर्फे समारात्मक कृतीचे गरज असते. आणि सर्वासाठी हक्क प्राप्त होतील याची तजवीज आंतरराष्ट्रीय समुदायाने केली पाहीजे.

***अडथळे***

जगाच्या एकपंचमांश लोकसंख्येला दारिद्रय आणि भूक या समस्येचे ग्रासले आहे. रोगराई, निरक्षरता आणि सामाजिक असूरक्षिततेचे प्रमाण सतत वाढत आहे. सन्मानांच्या जीवनासाठी आणि किमान कल्याणासाठी आवश्यक असणा–या बाबी आज बहूसंख्य मानवांना उपलब्ध नाहीत. मानवी हक्क आणि स्वातंत्र्याची पूर्तता होवू शकेल अशी परिस्थिती त्यांन उपलब्ध नसल्याने त्यांच्यादृष्टीने सामाजिक न्याय एक मृगजळ ठरले आहे. राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय पातळीवर गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी सतत वाढत आहे. प्रचलित धोरणांमुळे आणि संस्थांमुळे जगाच्या नैसर्गिक संपत्तीचे असमान वाटप होण्यात आधिक भर पडत आहे.

***उपाय:***

1.मुलभूत समाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक हक्कांच्या उल्लंघनाविरुध्द् आंतराष्ट्रीय समुदायाने आपला तीव्र असंतोष प्रगट केला पाहिजे.

2.आर्थिक विकासाच्या कायद्यांचा समाजातील सर्व स्तरांमधील लोकांना लाभ होतोच असे नाही. त्यामुळे आर्थिक आणि सामाजिक प्रगतीसाठी केलेल्या राष्ट्रीय प्रयत्नात आणि आंतराष्ट्रीय सहकार्यात आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा सर्वांना समानतेने लाभ व्हावा यासाठी अनुकुल वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न केले पाहिजे.

3.अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या मानवाच्या मूलभूत गरजांवर अत्याधिक खर्च केला पाहिजे. जागतिक स्तरावर दरवर्षी 767 मिलीयन डॉलर्स लष्करावर खर्च केले जातात असा अंदाज आहे. ही परिस्थिती बदलली पाहिजे.

**Please cite this Article as :** *प्रा. डॉ. प्रताप पाटील* **,** मानवी हक्काचे आंतरराष्ट्रीयीकरण **: Indian Streams Research Journal (April ; 2012)**